NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या २६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.१५ मार्च, २०२२ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची २६ वी बैठक मंगळवार दि.१५ मार्च, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. विकास पाटील - प्रभारी प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शं. द. नवले - प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ.शं.कि.पाटील - प्र.अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ५) | डॉ. द. सु. तिकटे, प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ६) | डॉ. वि. पां. शिखरे, प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. शि. सु. गणपूर, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ८) | सीए श्रे. हु. शहा, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ९) | डॉ. स. श्या. लड्डा, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. गौ. सु. कांबळे, प्र. संचालक, ज्ञानस्रोत केंद्र | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. सु. कि. पवार, संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. द. शा. परिचारक | सदस्य |
| १४) | प्राचार्य डॉ. भि. मु. भांजे | सदस्य |
| १५) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| १६) | श्री. अ. कि. आवळे | सदस्य |
| १७) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| १८) | डॉ. चं. सं. चव्हाण | सदस्य |
| १९) | डॉ. म. शं. कलशेट्टी | सदस्य |
| २०) | डॉ. गं. धु. बिराजदार | सदस्य |
| २१) | डॉ. तु. वि. शिंदे | सदस्य |
| २२) | डॉ. सु. कु. शिंदे | सदस्य |
| २३) | डॉ. ता. ज. फुलारी | सदस्य |
| २४) | डॉ. रा. शि. मेंते | सदस्य |
| २५) | प्रा. डॉ. गौ. सु. कांबळे | सदस्य |
| २६) | डॉ. श्रीमती मा. ज. पाटील | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| २७) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| २८) | श्री. शे. शं. साळुंके | सदस्य |
| २९) | श्री. रा. शि. गायकवाड | सदस्य |
| ३०) | श्री. ए. अ. मं. आ. शेख | सदस्य |
| ३१) | श्री. स. मा. गायकवाड | सदस्या |
| ३२) | श्री. सु. तु. सरवदे | सदस्य |
| ३३) | श्री. ता. ज. गावडे | सदस्या |
| ३४) | ॲड. श्रीमती नी. सु. मंकणी | सदस्या |
| ३५) | श्रीमती प. र. नागणसुरे | सदस्या |
| ३६) | ॲड. अ. शि. कळके | सदस्य |
| ३७) | श्री. ग. रे. धरणे | सदस्य |
| ३८) | श्री. मो. श्या. डांगरे | सदस्य |
| ३९) | प्रा. डॉ. म. बा. देशमुख, | सदस्य |
| ४०) | श्रीमती रे. अ. महागांवकर | सदस्या |
| ४१) | श्री. सि. भै. पाटील | सदस्य |
| ४२) | श्रीमती अ. अ. तडवळकर | सदस्या |
| ४३) | श्री. व. दौ.देशमुख, जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचा सदस्य | सदस्य |
| ४४) | डॉ. सु. कि. पवार - प्र. कुलसचिव | सदस्य सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नामनिर्देशित/नियुक्त झालेले प्रा.डॉ.वि.बा.पाटील, प्रभारी प्र-कुलगुरु, प्राचार्य डॉ.द.सु.तिकटे (प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा) व श्री.व.दौ.देशमुख (जिल्हा परिषदेच्या शिक्षण समिती सदस्य) यांची ही पहिलीच बैठक असल्याने अधिसभेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

अधिसभेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. सु. श्री. गोरे, श्री. प्र. त्रं. पाटील व श्री. शि. ब. हिरेमठ यांनी पत्राद्वारे/दूरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. तसेच डॉ.ध.र.माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे, डॉ. द. व्य. जाधव, विभागीय सहसंचालक (तंत्र शिक्षण), पुणे, डॉ. व. गु. कोरे, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, प्राचार्य डॉ. गु. नि. चिट्टे, प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे, प्राचार्य डॉ. श्रीमती कि. अ. पांडे , श्री. सं. स. नवले,

श्री. र. ब. शिंदे, कु. स्व. ज. मोहिते-पाटील, डॉ. श्रीमती भा. दि. रेवडकर, श्री. गि. फु. राणे, श्री. दि. अ. चव्हाण व श्री. म. म. अनासपुरे हे या अधिसभेच्या बैठकीस अनुपस्थित होते.

**निषेध:**

अधिसभेच्या बैठकीचे सदस्य सचिव यांची मुदत संपली असल्याने त्यांना सदस्य सचिव म्हणून काम पाहता येत नाही या कारणास्तव काही सदस्यांनी निषेध व्यक्त करुन सभात्याग केला व काही वेळानंतर सभागृहामध्ये उपस्थित राहिले.

प्र.कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा. कुलगुरुंना अधिसभेच्या २५ व्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

अ.क्र. **कुलसचिव कार्यालय:**

१. विद्यापीठाचा १७ वा वर्धापन दिन दि.०१ ऑगस्ट, २०२१ रोजी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आला.

२. १७ व्या विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. अरण्यऋषी श्री. मारुती चित्तमपल्ली यांना विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

३. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रम तयार करण्यात आले.

४. चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदांसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणारे अंशत: अनुदान दिले. तसेच विद्यांजली प्रकल्प परिणामकारकरित्या राबविण्याकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

५. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी सुधारित करावयाच्या चारही विद्याशाखांचा आराखडा व प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला.

६. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विद्यापीठ अधिविभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनीमधुन "मुली शिकवा समाज घडवा" या योजनेसाठी एकूण ३६ विद्यार्थीनींची निवड करण्यात आली आहे. सदर निवड झालेल्या विद्यार्थीनींना कोव्हीड-१९ च्या प्रार्दुभावाचा विचार करुन सरासरी रु.१०,०००/- प्रमाणे एकूण रु.३,६०,०००/- इतकी रक्कम आदा करण्यात आली आहे.

**शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग:**

७. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राप्त ०५ प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे.

८. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन अभ्यासक्रम / विषय, तुकडी, विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त ४२ प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे.

९. विद्यापीठाकडून विभागीय संशोधन शिष्यवृत्ती (DRF) अंतर्गत एकूण १४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे.

१०. दि.१३/०८/२०२१ ते दि.३१/१२/२०२१ या दरम्यान सर्व विद्याशाखानिहाय ऑनलाईन पध्दतीने एकूण ४१ पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा घेण्यात आल्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

**परीक्षा व मूल्यमापन विभाग :**

११. प्रस्तुत विद्यापीठाचा १७ वा दीक्षांत समारंभ दि. ११ जानेवारी २०२२ रोजी मा. कुलपती महोदय श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या उपस्थितीत ऑनलाईन पद्दध्तीने संपन्न झाला. सदरील समारंभात ६२ विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती पदवी व ५५ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके वितरीत करण्यात आली. तसेच एकूण १२४७७ स्नातकांनी पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले.

१२. विद्यापीठाकडून नमूद केलेल्या कालावधीमध्ये वेगवेगळ्या अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन झालेल्या परीक्षांचे निकाल वेळेत प्रसिध्द करण्यात आले आहेत, तसेच जाहीर निकालाप्रमाणे गुणपत्रिका वेळेत छपाईसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या.

**वित्त व लेखा विभाग:**

१३. संकुलातील विद्यार्थ्यांकरिता प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क व इतर सर्व शुल्क ऑनलाईन पध्दतीने करण्याकरिता /QR Code/Swipe Machine इ. सोय करण्यात आली आहे.

१४. विद्यापीठामध्ये परीक्षा, बैठका व विविध कामाकरिता येणारे सन्माननीय अधिकारी मंडळाचे सदस्य, प्राध्यापक व इतर यांची देयके सध्या Bank of India च्या Corporate Internet Banking द्वारे संबंधितांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे. यामुळे त्यांची देयके अचूक व तात्काळ जमा होत आहेत.

**ज्ञानस्रोत केंद्र:**

१५. दिव्यांगासाठी अभ्यासकेंद्र रंगभवन येथे ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१६. ज्ञानस्रोत केंद्राचे नाव बदलून 'कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र' असे नामकरण करण्यात आले आहे.

**क्रीडा विभाग:**

१७. दि.२९ ऑगस्ट, २०२१ हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून प्रस्तुत विद्यापीठात ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला.

**राष्ट्रीय सेवा योजना:**

१८. भारत निवडणूक आयोग व जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी कळविल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये दि.०१/११/२०२१ ते दि.३०/११/२०२१ या दरम्यान 'मतदान नोंदणी अभियान' कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये ९४० विद्यार्थांची नाव नोंदणी झाली.

१९. रासेयो योजना एकक असलेल्या महाविद्यालयामध्ये 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत वृक्ष लागवड, संवर्धन, इंधन विरहित वाहनांचा वापर करणे, जलस्रोतांची स्वच्छता करणे, माझी वसुंधरा या हरित अभियानाची सुरूवात माझी वसुंधरा ई-मित्र प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच माझी वसुंधरांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

२०. सन २०२०-२१ राज्यस्तरीय पुरस्कार प्रस्तुत विद्यापीठ रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयातील

कु. समर्थ मधुकर चिवरे, डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर यास उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

**विद्यार्थी विकास विभाग:**

२१. विद्यापीठातील सर्व संकुलातील तसेच सर्व संलग्न महाविद्यालयात सन २०२१-२२ या वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांचा विमा उतरविण्यासाठी टाटा ए आय जी जनरल इन्शुरन्स कंपनी लि., लातूर यांच्या सोबत प्रति विद्यार्थी यांच्यासाठी रू ६८ / - योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

२२. विद्यापीठाचा १७ वा युवा महोत्सव दि. ६ ते ८ सप्टेंबर, २०२१ या दरम्यान विविध महाविद्यालयात ऑनलाईन आयोजित करण्यात आला होता.

**आयक्युएसी विभाग (रुसा):**

२३. दि. २०/०९/२०२१ रोजी प्रस्तुत विद्यापीठाचा 2nd Cycle चा DVV हा नॅक बेंगलोर यांच्या ऑनलाईन पोर्टलवर Submit करण्यात आला.

२४. विद्यापीठाचे २ Cycle अंतर्गत दि. २०, २१ व २२ जानेवारी, २०२२ रोजी नॅक च्या पिअर टिमने विद्यापीठास भेट देऊन पाहणी केली.

**कौशल्य विकास केंद्र:**

२५. कौशल्य विकासकेंद्राअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी एकूण १०० अभ्यासक्रम सुरू होते. शै. वर्ष २०२१-२२ मध्ये १३२ अभ्यासक्रम महाविद्यालय / संस्था / संकुलांमध्ये सुरु करण्यात आले आहेत.

२६. कौशल्य विकास केंद्राअंतर्गत सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी प्रथम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये घेण्यात आल्या, सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे निकाल विहित वेळेत घोषित करून सर्व महाविद्यालय/ संस्थाना विद्यार्थ्यांचे गुणपत्रक व प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली आहेत.

२७. 1) MIT College of Railway Engineering & Reserch, Barshi. 2) Indian Council for Technical Research and Development, Nagpur. 3) Epico Edutech Private Limited, Solapur. 4) Think Trans, Pune यांनी प्रस्तुत विद्यापीठातील कौशल्य विकासकेंद्रा अंतर्गत नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरून चारही संस्थाशी विविध अभ्यासक्रमाचे सामंजस्य करार (MoU) दिनांक १३/१०/२०२१ रोजी करण्यात आले.

**नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ:**

२८. IDEMI ही भारत सरकारने इन्स्ट्रमेंट इंडस्ट्री ऑर्गनायझेशन सेवा म्हणून सन १९६९ मध्ये स्थापन केलेली संस्था आहे. या संस्थेशी MoU करण्यात आला आहे.

२९. महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटी यांनी दोन दिवसीय Capacity Building work shop for MSinS Supported Incubator २०२१ या कार्यशाळेस दि.२१/१०/२०२१ ते दि.२२/१०/२०२१ रोजी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सचिन श्यामसुंदर लड्डा उपस्थित होते.

३०. महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटी यांनी दोन दिवसीय Nomination & Incubator for Start up Expo-VC Mixer २०२१ या कार्यशाळेस दि.१५/११/२०२१ रोजी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सचिन श्यामसुंदर लड्डा उपस्थित होते.

**मुलांचे व मुलींचे वसतिगृह:**

३१. विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहण्याकरीता सुसज्य व्यायामशाळेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३२. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याकरीता अभ्यासिका कक्ष उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना सुसज्य असे संगणक कक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**संकुले:**

**भौतिकशास्त्र संकुल:**

३४. प्रा. डॉ. विकास पाटील यांना सेंटर फॉर प्रोफेशनल ॲडव्हान्समेन्ट, हैद्राबाद संस्थेने इन्टरनॅशनल इनोव्हेशन ॲन्ड रिसर्च एक्सलन्स ॲवार्ड-२०२१ इन फिजीक्स देण्यात आला.

३५. प्रा डॉ. एस. एस. सुर्यवंशी यांचा Scientific Report, Nature या उच्च नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये शोधनिबंध प्रसिध्द झाला.

**भाषा व वाङ्मय संकुल:**

३६. १७ सप्टेंबर हा दिवस देवमित्त भन्ते अनागारिक धम्मपाल यांचा जन्म दिन "जागतिक पालि भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने भाषा व वाङ्मय संकुलातील पाली विभागामार्फत दिनांक १८/०९/२०२१ रोजी श्री. गौतम मोरे, सोमैय्या कॉलेज, मुंबई यांचे "देवमित्त भन्ते अनागारिक धम्मपाल यांचे पालिविषयी योगदान" या विषयावर (ऑनलाईन) व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

३८. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात सेट/नेट (पेपर क्र. २) परीक्षेसाठी भाषा व वाङ्मय संकुलाच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, ऊर्दू, पाली, कन्नड, संस्कृत व प्राकृत या सर्व विभागामार्फत दि.२४/०९/२०२१ व २५/०९/२०२१ दरम्यान ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

**भुशास्त्र संकुल:**

३९. डॉ. व्ही.पी.धुळप यांनी सोलापूर महानगरपालिका क्षेत्राचा सन २०२० -२१ चा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल तयार करून महानगरपालिका आयुक्त व महापौर, सोलापूर महानगरपालिका यांना सुपुर्द केला.

४०. प्रस्तुत विद्यापीठाचे NAAC मूल्यांकनासाठी लागणारे ग्रीन ऑडिट हे पर्यावरण शास्त्र विभाग, भूशास्त्र संकुल मार्फत करण्यात आले.

४१. डॉ.धुळप यांनी Environmental Monitoring या विषयावर गोवा विद्यापीठ आयोजित ATAL - Faculty Development Program मध्ये उदभोदन केले.

**वाणिज्य व व्यवस्थापन संकुल:**

४२. दि.०८/१०/२०२१ रोजी MBA द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना Specialization निवडण्यासाठी Online मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत डॉ. मरिना करंगुटकर यांनी Caree Opportunities at the MBA या विषयावर मार्गदर्शन केले.

४३. MBA व M.Com. च्या सर्व मुलींसाठी दि.१२/१०/२०२१ रोजी आरोग्य व सकस आहार या विषयावर Online कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस श्रीमती. श्रध्दा पटेल व श्रीमती. ज्योती माळी यांनी मार्गदर्शन केले.

४४. एम. कॉम. व एम. बी. ए. च्या विद्यार्थ्यांना NPTEL व CDEEP, IIT Bombay यांच्याकडून Swayam Courses विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिलेला आहे.

**ललितकला व कला संकुल:**

४५. ललितकला व कला संकुलातील एम.ए.नाट्यशास्त्र या विभागाकडून दि.२५ सप्टेंबर, २०२१ रोजी "नेट/सेट" या विषयावर डॉ. अमोल देशमुख (पुणे) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

४६. ललितकला व कला संकुलातील संगीत (गायन/वादन) या विभागाकडून दि.२६/११/२०२१ रोजी 'दिपसंध्या' व स्वप्न एकलव्य या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

४७. ललितकला व कला संकुलातील संगीत (गायन/वादन) व नाट्यशास्त्र या विभागाकडून दि.२७/११/२०२१ रोजी 'दिपसंध्या' व स्वप्न एकांकीका' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**तंत्रज्ञान संकुल:**

४८. विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रिया माहिती होण्याकरीता राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली व तेथील संशोधन प्रयोगशाळेतील विविध उपकरणांबाबत माहिती देण्यात आली.

४९. संकुलातील विद्यार्थ्यांनी "आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत आमंत्रित व्याख्यानात सहभाग नोंदवला.

**संगणकशास्त्र संकुल:**

५०. श्री. सिध्देश्वर वुमन पॉलीटेक्नीक, सोलापूर या संस्थेसोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात आला.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] **अधिसभेच्या दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील परिनियम १५ नुसार, दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२१ / ७९१८, दि.२५/१०/२०२१ अन्वये पाठविण्यांत आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.०८/११/२०२१ पर्यंत होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्याची बाब विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव:** | **अधिसभेच्या दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

[ २ ] **अधिसभेच्या दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेली कार्यवाही विचारार्थ.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील परिनियम १५ नुसार, दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२१ / ७९१८, दि.२५/१०/२०२१ अन्वये पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.०८/११/२०२१ पर्यंत होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत. त्यानुसार सदरचे ठराव / सूचना संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते.

सबब, अधिसभेच्या दि. ११ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीतील ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | **अधिसभेच्या दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

[ ३ ] २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील नियम क्र. ६ (१६) नुसार अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे.

२०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ नुसार, प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले उत्तर, २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील ६ (१४) अन्वये अधिसभेच्या सदस्यांना पाठविण्यात आले होते.

| | |
|---|---|
| ठराव: | १) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:४३ वाजता सुरु झाला व दुपारी ०१:४३ वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र. १५ ते १८ व त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत.<br>२) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र “अ”) |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

[ ४ ] **विद्यापीठाचे सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३(१) नुसार विद्यापीठाचे सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता समान लेखा संहिता कलम २.१२ (i) नुसार उपसमिती मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे गठीत करण्यात आली होती.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. महेश एम. माने | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे | सदस्य |
| ३) | डॉ. डी. डी. कुलकर्णी | सदस्य |
| ४) | सीए श्रेणीक शाह | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.०४ ते ०७/०१/२०२२ दरम्यान विविध विभाग/संकुले प्रमुखांसोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्च, त्यांची चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा, खर्च व त्यांची मागणी तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इत्यादीबाबत आढावा घेण्यात आला व त्यानुसार सद्य:स्थितीत कोरोना महामारीमुळे उत्पन्नात होणारी घट तसेच आवर्ती खर्चात वरचेवर होणारी वाढ ही बाब विचारात घेऊन एकूण खर्चात कपात करुन सुधारित व मूळ अंदाजपत्रकीय अंदाज ठरविण्यात आले आहेत व सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्पाचा मसूदा तयार करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९४(६)(क) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.३१/०१/२०२२ रोजी झालेल्या सभेसमोर विषय क्र.०२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होवून त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्पावर सर्वकष चर्चा होऊन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०२२ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.१२ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव: | विद्यापीठाचा सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह अधिसभेस बहुमताने शिफारस करण्यात आली.<br>सदर ठरावास डॉ. ह. कृ. आवताडे, श्री. अ. कि. आवळे, डॉ. ब. पां. रोंगे, ॲड श्रीमती नी. सु. मंकणी व कु. अ. चं. चव्हाण या सदस्यांनी खालील कारणांसाठी भिन्न (Dissent) मताची नोंद केली.<br>१. सदर आजची व्यवस्थापन परिषद बैठक यापूर्वी दि.११/०२/२०२२ रोजी ठरलेली होती. तथापि, अंदापजत्रक हे काही सदस्यांना उशिराने म्हणजेच शुक्रवार दि.११/०२/२०२२ व काही सदस्यांना त्यानंतर मिळालेले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही.<br>२. अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास झाल्याशिवाय त्याबाबत कोणतेही मत मांडणे उचित होणार नाही. तसेच ते विद्यापीठाच्या हिताचे होणार नाही. त्यामुळे पुरेसा वेळ देवून त्याबाबत व्यवस्थापन परिषदेची अंदाजपत्रकासाठी पुनश्च बैठक घ्यावी अशी रास्त मागणी मान्य न केल्यामुळे. |

सबब, विद्यापीठाचे सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२३ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली मान्यतेची शिफारस विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव : | **सीए श्रेणीक शहा, वित्त व लेखा अधिकारी यांनी विद्यापीठाचा सन २०२१-२२ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२२-२३ चा मूळ अर्थसंकल्प सादर केल्यानंतर, सभागृहात उपस्थित सदस्यांपैकी २१ सदस्यांनी विरोध दर्शविला, १४ सदस्यांनी अर्थसंकल्पाच्या बाजूने मत नोंदविले व ०३ सदस्य तटस्थ राहिल्याने अर्थसंकल्प बहुमताने नामंजूर करण्यात आला.**<br>**तसेच याबाबत मा.कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन मागवून त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ ५ ] **शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक योजनेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचा (अल्पकालीन बृहत आराखडा) महाराष्ट्र शासनास सादर करणेची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये अधिसभेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी दिलेली मान्यता माहितीस्तव.**

(टिपणी: शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक योजनेचा सर्व समावेशक योजनेस शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या एका वर्षाच्या बृहत आराखड्यास यापूर्वी मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचा (अल्पकालीन बृहत आराखडा) तयार करुन घेणे आवश्यक आहे.

यास्तव, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७(५) तरतुदीस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्यासाठी स्थानिक वर्तमान पत्रात जाहीर निवेदन देऊन, तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांना पत्राद्वारे आवाहन करुन निवेदन मागविण्यात आलेले आहेत. प्राप्त झालेले निवेदने व प्रस्तुत विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा विचारात घेऊन छाननी समितीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तयार केलेला बृहत आराखडा दि.२१/०५/२०२१ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता, ठराव क्र:३ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा एक वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ शिफारस करण्यात आला असा ठराव पारित करण्यात आला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७(१) नुसार अधिष्ठाता मंडळाकडुन तयार करण्यात आलेला बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदे मार्फत विद्या परिषदेच्या व अधिसभेच्या बैठकीत सादर करणे आवश्यक आहे.

दरम्यानच्या काळात अधिसभा बैठक प्रस्तावित नव्हती. प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखडा विहित वेळेत तयार होऊन सदरचा आराखडा दि.३० जुन, २०२१ पुर्वी शासनाच्या मंजुरीकरिता पाठविणे आवश्यक असल्याने मा.कुलगुरु यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये अधिसभेच्या वतीने सदर १ वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखड्यास मा.कुलगुरु यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक योजनेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचा (अल्पकालीन एक वर्षाचा बृहत आराखडा) महाराष्ट्र शासनास सादर करणेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये अधिसभेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही अधिसभेच्या माहितीस्तव).

| | |
|---|---|
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक योजनेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचा (अल्पकालीन बृहत आराखडा) महाराष्ट्र शासनास सादर करणेची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये अधिसभेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

[ ६ ] **अधिसभा सदस्य श्री. गजानन रेवणसिध्द धरणे यांचा प्रस्ताव.**

"श्रीमती सुरय्या शेख यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी महिला उमेदवाराची निवड करावी अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे व श्री. सिध्दाराम भैरप्पा पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते विद्या परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

[ ७ ] **अधिसभा सदस्य श्री. मोहन श्यामसुंदर डांगरे यांचा प्रस्ताव.**

"आपणास माहीत आहेच आपल्या विद्यापीठास स्थापन होऊन १८ वर्षे पूर्ण झाले आहेत. विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरुंनी तत्कालीन विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेस ठराव घेऊन सोलापूर विद्यापीठाचे बोधचिन्ह महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने विद्यापीठात वापरात आणले होते.

महाराष्ट्र शासनाचे राजपत्र असाधारण भाग ८, दि.०५ मार्च, २०१९ नुसार विद्यापीठाचे नामांतरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर असे करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठातील सर्व अधिकृत ठिकाणी हे नाव वापरण्यात आले. परंतु विद्यापीठाचे बोधचिन्ह मात्र अजूनही जुनेच वापरात आहे, या पत्राद्वारे आपणास विनंती आहे की महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम ७ मधील विद्यापीठाची उद्दिष्टे याला अनुसरुन व विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या नावाला शोभेल असे बोधचिन्ह करण्याची शिफारस १५ मार्च, २०२२ ला होणाऱ्या अधिसभेत मी करत आहे तसेच व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह महाराष्ट्र शासनाची मान्यता घेऊन आपल्या विद्यापीठास लवकरात लवकर नवीन बोधचिन्ह मिळावे ही अपेक्षा."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा विषय मागे घेण्याबाबत श्री. मोहन श्यामसुंदर डांगरे यांनी दि.११/०३/२०२२ रोजीच्या लेखी पत्राद्वारे विनंती केल्याने सदरचा प्रस्ताव मागे घेण्यास सभागृहाने एकमताने परवानगी दिली.** |

[ ८ ] अधिसभा सदस्य श्री. शिवानंद बसलिंगय्या हिरेमठ यांचा प्रस्ताव.

"केंद्रीय उच्च शिक्षण मंत्रालयांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय शिक्षण परिषदेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास 'सोलापूर जिल्हा ग्रीन चॅम्पियन' जिल्हास्तरावर प्रथम पुरस्कार विद्यापीठास प्राप्त झाला आहे. यानिमित्ताने ही अधिसभा मा.कुलगुरु व विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदनाचा ठराव मांडत आहे."

| ठराव: | सदरचा प्रस्ताव अधिसभा सदस्य श्री. शिवानंद बसलिंगय्या हिरेमठ यांनी मांडला नसल्याने वगळण्यात आला. |
|---|---|

[ ९ ] अधिसभा सदस्य श्री. शिवानंद बसलिंगय्या हिरेमठ यांचा प्रस्ताव.

"डॉ. वि. ल. कदम हे OSD या पदावरुन मुक्त झाल्यानंतर ज्या तारखेपर्यंत ते विद्यापीठाच्या बंगल्यामध्ये होते त्या तारखेपर्यंतचे नियमाप्रमाणे बंगला भाडे व इतर सुविधा वापरले असल्यास त्यापोटीची रक्कम श्री. कदम यांच्याकडून वसूल करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्यापीठ प्रशासनास करीत आहे."

| ठराव: | सदरचा प्रस्ताव अधिसभा सदस्य श्री. शिवानंद बसलिंगय्या हिरेमठ यांनी मांडला नसल्याने वगळण्यात आला. |
|---|---|

[ १० ] **अधिसभा सदस्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण यांचा प्रस्ताव.**

"सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या स्वायत्त महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील इतर विद्यार्थ्याप्रमाणेच त्यांची गुणांची दखल घेऊन विद्यापीठाचे सुवर्णपदक देण्यात यावे, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करित आहे."

| ठराव: | **सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. सुशिल कुमार शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |
|---|---|

[ ११ ] **अधिसभा सदस्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण यांचा प्रस्ताव.**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत कार्यरत महाविद्यालयातील संशोधन मार्गदर्शनाच्या निरिक्षण व मार्गदर्शनाखाली काम करित असलेल्या पण त्या महाविद्यालयात संबंधित विषयाचे संशोधन केंद्र नसल्याने विद्यापीठात प्रवेशित JRF व Post Doctoral Fellowship असलेले विद्यार्थी विद्यापीठातील केंद्रा ऐवजी संबंधित मार्गदर्शकांकडे संशोधनाच्या कार्याकरिता हजर राहण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे."

| ठराव: | **सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते विद्या परिषदेस शिफारस करण्यात आली.** |
|---|---|

[ १२ ] **अधिसभा सदस्य डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण यांचा प्रस्ताव.**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत संशोधन करित असलेल्या विद्यार्थ्यांकरिताचा पीएच.डी. कोर्स वर्क विद्यापीठातील विभागांमध्ये व शक्य नसल्यास महाविद्यालयातील केंद्रामध्ये घेण्याची शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करित आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. राजेंद्र शिवाजी गायकवाड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते विद्या परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ १३ ] **अधिसभा सदस्य श्री. शेखर शंकरराव साळुंखे यांचा प्रस्ताव.**

| Proposal | Addressed to |
|---|---|
| On behalf of the Senate body, I Propose to immediately disburse the pending remuneration bills towards PSAHSUS – March/April 2020 OE/POE/Paper setting in regard to Online exams. | Hon. Director, Board of Exams; / Hon. Finance & Accounts Officer, PSAHSUS. |

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे शिफारस करण्यात आली. |

मा. कुलगुरु, प्रभारी प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून वंदे मात्रम नंतर बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

प्र. कुलसचिव
सदस्य सचिव, अधिसभा

कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा

जोडपत्र "अ"

## विषय क्र. ०३ चे सहपत्र

## अधिसभेच्या मंगळवार, दि. १५ मार्च, २०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. म. बा. देशमुख | | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी |
| १ | How many depts. have received grants from DST-FIST Programme for the research so far? | Not received grants to Departments on campus from DST-FIST Programme for the research so far. |
| | • DST-FIST मध्ये Grant मिळविण्यासाठी किंवा ही स्कीम लागू करण्यासाठी विद्यापीठातील कोणकोणत्या विभागांनी प्रस्ताव सादर केलेला आहे? | स्कूल ऑफ सोशल सायन्सेस व स्कूल ऑफ कॉम्प्युटेशनल सायन्सेस या दोन संकुलांनी प्रस्ताव सादर केलेला होता. |
| | • या संदर्भात पुढे काय झाले? | अद्याप अनुदान प्राप्त झालेले नाही. |
| २ | How many, National and International papers published by University during last year? | Number of Papers Published 32 (01/01/2021 to 31/12/2021) |
| | • ३२ रिसर्च पेपर्स पैकी किती पेपर स्पोकस लिस्टेड जरनलमध्ये पब्लीश झाले आहेत? | ४ रिसर्च पेपर्स स्पोकस लिस्टेड जरनलमध्ये पब्लीश झाले आहेत. |
| श्री. मो. श्या. डांगरे | | डॉ. वि. पां. शिखरे |
| ३ | आताची PET परीक्षा जी झाली, ती २०१९-२० ची झाली. यंदाच्या वर्षीच्या PET परीक्षेचे काय? | PET-८ करिताची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील PET बाबत प्रक्रिया सुरु करण्यात येईल. |
| | • इंजिनिअरींग मधील PET परीक्षा प्रवेश प्रक्रिया संपलेली आहे का? | First Round झालेला आहे. Second Round च्या सर्व Faculty च्या उर्वरित जागा पब्लिश केलेल्या आहेत, आणि दि.२२/०२/२०२२ रोजी Second Round साठी विद्यार्थ्यांना इंटरव्हिवसाठी बोलविलेले होते. |
| | • इंजिनिअरींग Faculty मधील बाकीचे राहिलेली संख्या सांगता येईल का? | Second Round साठी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग चे १० जागा व कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींगचे ६ जागा शिल्लक आहेत. |
| ४ | परीक्षा शुल्कात यंदाच्या वर्षी आपण किती टक्क्यांनी वाढ केली आहे? | परीक्षा शुल्कात यंदाच्या वर्षी १०% वाढ केली आहे. |
| डॉ. गं. धु. बिराजदार | | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील |
| ५ | मार्च २०२०-२१ परीक्षेच्या गुणपत्रिकेचे Ledger तयार आहे का? | मार्च २०२०-२१ परीक्षेच्या गुणपत्रिकेचे Ledger तयार आहे. |
| | • सदर लेजर पेपर महाविद्यालयांना वितरीत केले आहेत का? | मार्च २०२१ पर्यंतचे लेजर प्रिंट झालेले आहेत व संबंधित महाविद्यालयांना घेवून जाण्यासाठी कळविण्यात आले आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • नियमानुसार लेजर परीक्षा संपल्यानंतर किती दिवसामध्ये वितरीत करणे आवश्यक आहे? | निकाल लागल्यानंतर त्वरीत वितरीत करण्यात येते. |
| ६ | विद्यापीठ विरोधातील विविध न्यायप्रविष्ठ प्रकरणासाठी केल्या जाणाऱ्या खर्चास व्यवस्थापन परिषदेची पूर्व मंजूरी घेतली जाते का? | नाही. |
| | • व्यवस्थापन परिषदेची मान्यता का घेतली नाही? | व्यवस्थापन परिषदेने मा. कुलगुरु यांना निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले आहेत. |
| **श्री. रा. शि. गायकवाड** | | **प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील** |
| ७ | विद्यापीठास Electric गाड्यांची खरेदी करताना व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली का? | नाही. |
| | • विद्यापीठामध्ये अशा किती गाड्या खरेदी केलेल्या आहेत? | दोन. |
| | • महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ अन्वये, सदर गाड्या खरेदी करत असताना व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक असताना मान्यता का घेतली नाही? | Account Code मधील तरतूदीनुसार, १० लाखापेक्षा जास्त किंमत असेल तर व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने खरेदी करण्यात येते. तसेच १० लाखापर्यंतचा खर्च करण्यास मा. कुलगुरु यांना पूर्ण अधिकार आहेत. |
| | • या गाड्या खरेदी करताना ई-टेंडर प्रक्रिया राबविली आहे का? | Account Code मधील तरतूदीनुसार, Purchase of Item Directly from Manufacturer कडून घेण्यासाठी मा. कुलगुरु यांना पूर्ण अधिकार दिले आहेत. |
| **डॉ. सु. कु. शिंदे** | | **प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील** |
| ८ | सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीत कोणकोणत्या महाविद्यालयांच्या प्रभारी प्राचार्य यांच्या प्रस्तावावर मंजुरी देण्यात आली? | सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीमधील प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित १८ महाविद्यालयांना प्रभारी प्राचार्य पदास मान्यता देण्यात आली आहे. (सदर महाविद्यालयांची यादी सोबत जोडली आहे - सहपत्र क्र.०५ व ०६) |
| | • सदर प्रभारी प्राचार्यांना मान्यता देत असताना काहींना संपूर्ण शैक्षणिक वर्ष तर काहींना केवळ एका सत्रासाठी मान्यता का देण्यात आली? | महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. |
| | • कोणकोणत्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य पदाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत? | कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ★ NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत? | सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. |
| | • सदर प्रस्ताव विद्यापीठास कोणत्या महिन्यात प्राप्त झाला? | दि.३० ऑगस्ट, २०२१. |
| **श्री. ग. रे. धरणे** | | **प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी** |
| ९ | मार्च/एप्रिल २०२० पासून आतापर्यंत प्रॅक्टिकल, ओरल, पेपर सेटिंग चे मानधन संबंधित शिक्षकांना देण्यात आले का? | माहे मार्च/एप्रिल, २०२० पासून आतापर्यंतचे प्रॅक्टिकल, ओरल पेपर सेटिंगचे मानधन संबंधित शिक्षकांना देण्यात आलेले आहे. |
| | • सदरचे मानधन ऑनलाईन जमा होते का ऑफलाईन? | परीक्षेचे मानधन ऑनलाईन जमा होते. |
| १० | मार्च/एप्रिल २०२० पासून झालेल्या परीक्षांचे विद्यार्थ्यांना गुणपत्रिका मिळाल्या का? | मार्च/एप्रिल २०२० पासून झालेल्या परीक्षांचे गुणपत्रिका ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अंतिम करण्यात आलेली आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका संबंधित महाविद्यालयांना विद्यापीठामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. |
| | • परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे निकाल आणि त्यांची गुणपत्रिका विद्यार्थ्यांना मिळालेले आहेत का? | पात्रता नसलेल्या विद्यार्थ्यांचे गुणपत्रिका राखीव ठेवण्यात येतात व पात्रता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका पाठविण्यात येतात. |
| | • विद्यार्थ्यांची पात्रता अंतिम करण्यासाठी परीक्षेपूर्वी किती दिवस मुदत दिली जाते? | पात्रता निकष पुर्ण केल्यानंतर त्वरीत पात्रता करण्यात येते. |
| | • पात्रता पूर्ण करीत नसलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरता येते का? | होय, परीक्षा फॉर्म भरुन घेण्यात येते. परंतु पात्रता निकष पूर्ण केल्याशिवाय Result राखीव ठेवण्यात येते. |
| **श्री ता. ज. गावडे** | | **डॉ. वि. पां. शिखरे** |
| ११ | NAAC साठी रस्ते, रंगकाम इ. कामासाठी टेंडर (Tender) प्रक्रिया राबविली आहे का? | रस्ते कामासाठी होय.<br>रंगकामासाठी नाही. |
| | • महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ अन्वये, सदर खर्चासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली आहे का? | होय. |
| | • रंग कामासाठी टेंडर प्रक्रिया न राबविण्याचे कारण काय? | रंग कामासाठी कोटेशन पध्दत राबविली आहे. Account Code मधील तरतूदीनुसार, रु.१० लाखांपेक्षा जास्त खर्चासाठी टेंडर प्रक्रिया राबविण्यात येते. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर | |
|---|---|---|---|
| १२ | सन २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षात विद्यापीठ परिसरात वृक्ष लागवडीसाठी किती खर्च करण्यात आला? | Tree Plantation या शिर्षकाखाली सन २०१९-२० मध्ये रु.१,७२,२७५/- व सन २०२०-२१ मध्ये निरंक इतकी रक्कम खर्ची पडली आहे. | |
| | • सन २०१९-२० मध्ये किती वृक्ष लागवड करण्यात आले आहे? | २६० | |
| श्री स. मा. गायकवाड | डॉ. वि. पां. शिखरे | | |
| १३ | RUSA मार्फत आलेल्या एकूण अनुदानापैकी किती अनुदान व व्याज RUSA संस्थेकडे परत केले आहे? | मिळालेले एकूण अनुदान | रु. २१,०५,२५,०००/- |
| | | एकूण व्याज | रु. १,२१,२९,८७०/- |
| | | एकूण | रु. २२,२६,५४,८७०/- |
| | | पैकी परत केले | रु. ९,०८,५९,९५३/- |
| | | एकूण खर्च | रु. १३,१७,९४,९१७/- |
| | • RUSA कडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी परत केलेली रु.९,०८,५९,९५३/- ही रक्कम कोणत्या हेड अंतर्गत होती? | Boys Hostel आणि Junner Project. | |
| | • व्याजाची रक्कम आपल्याला वापरता येते का? | होय, RUSA च्या परवानगीने वापरता येते. | |
| १४ | विद्यापीठाने मंजूर केलेल्या अध्यासन केंद्राची स्थापना झालेली आहे का? | विद्यापीठ अध्यासन केंद्र मंजूर करित नाही. त्यामुळे अध्यासन केंद्राची स्थापना होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. | |
| | • अध्यासनाचे जे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले गेले आहेत त्याचा पाठपुरावा प्रशासनाने केला आहे का? | व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने आजपर्यंत ८ अध्यासन केंद्रासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत. त्यापैकी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्रास मंजुरी मिळालेली आहे. ७ प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी प्रतिक्षेत आहेत. यासाठी प्रशासनाचा पाठपुरावा सुरु आहे. | |
| | • महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राची सुरुवात कधी होणार? | महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच या संदर्भात शासनाकडून उपसमिती गठीत करण्यात आली आहे. आणि सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अध्यासन केंद्रासाठी अनुदान प्राप्त होईल. त्यानंतर आपल्या विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरु करण्यात येईल. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने अध्यासन केंद्र मंजुरीच्या सिनेटच्या ठरावानुसार अध्यासन केंद्राच्या पुढील प्रक्रियेसाठी शासनास माहिती देण्यास्तव कोणती समिती गठीत करण्यात आली आहे का? | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार शासनाकडे पाठविलेला आहे.<br>स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| | • छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचा प्रस्ताव अद्याप विद्यापीठाकडे प्रलंबित का आहे? | छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या प्रस्तावासंदर्भात समिती गठीत केली आहे आणि सदर समितीची बैठक होणे बाकी आहे. |
| | • बैठकीस विलंब का लागला? | कोविडच्या प्रादूर्भावामूळे बैठक होवू शकली नाही. लवकरात लवकर बैठकीचे नियोजन करण्यात येईल. |
| | • डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राला ३ वर्षापूर्वी मंजूरी मिळाली होती तो प्रस्ताव केंद्रशासनाकडे गेला आहे का राज्य शासनाकडे गेला आहे? | डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या प्रस्तावासंदर्भात केंद्र शासनाकडे ३ वेळा Reminder पाठविलेले आहे. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर NAAC Accredited-2015 B Grade (CGPA 2.62)

(सचिव अधिसभा)
प्र.कुलसचिव

## सोलापूर शहर

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | प्राचार्य / प्र.प्राचार्य नाव व मोबाईल क्र. |
|---|---|---|
| 1 • | **सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, सोलापूर.** नेहरु नगर, सोलापूर. ४१३ ००४ Email: sushilbped2012@gmail.com Website: www.ssscopen.org | प्रभारी प्राचार्य श्रीमती. डॉ. देशपांडे (शैक्षणिक वर्ष-२०२० ते २१ करीता) |
| 2 | **कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सोलापूर** सर्व्हे नं. ६३/१अ, एफपी नं.३४, उजनी कॉलनी, टी. व्ही. टॉवरच्या पाठीमागे, कुमठा नाका, सोलापूर. ४१३ ००३ Email: archcoa_ssm@rediffmail.com Website: www.archsolapur.org | श्रीमती ए.एन. काटगांवकर (प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार) ७६२०१२२२६२ (शै.वर्ष-२०२० ते २१ मधील प्रथम सत्राअखेर पर्यंत) |
| 3 Aided • | **सोलापूर सोशल असोसिएशनचे, आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.** नवीन इमारत, सैफी हॉस्पिटलच्या समोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. ४१३ ००१ Email: socialcollege@gmail.com | प्रभारी प्राचार्य, प्रा. डॉ.आय.जे. तांबोळी |
| 4 • | **शरदचंद्र पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर.** अभिषेक नगर, उमा नगरी समोर, मुरारजी पेठ, पुना रोड, सोलापूर. ४१३ ००२ Email: spcollege@gmail.com | प्रभारी प्राचार्य, डॉ. एन.व्ही. पाटोळे (शै.वर्ष-२०२०-२१ च्या प्रथम सत्राअखेर पर्यंत मान्यता) |
| 5 Aided • | **युनियन एज्युकेशन सोसायटीचे, महिला महाविद्यालय, सोलापूर.** १४१ ए, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. ४१३ ००१. Email: uesmm@yahoo.com Website: www.uesmahilamahavidyalaya.org | प्रभारी प्राचार्या, श्रीमती. डॉ. एफ.एम. शेख ९९६०२३६६१८ (शै.वर्ष-२०१८-१९ ते २०१९-२० व (शै.वर्ष-२०२०-२१ करीता मान्यता. |
| 6 Aided • | **कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.** सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक,सोलापूर. ४१३ ००६ Email: kcesolapur@gmail.com Website: http://kcebed.org | प्रभारी प्राचार्य, डॉ. बोंदार्डे ए.के. ९९६०१९४५०७ शै.वर्ष-२०२१-२२ करीता |

## तालुका अक्कलकोट

| | | |
|---|---|---|
| 7 Aided • | **सी.बी.खेडगीज बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स, राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट.**ता.अक्कलकोट, जि.सोलापूर. ४१३ २१६ | प्रभारी प्राचार्य डॉ. जी.एस. धबाले शै.वर्ष-२०२१-२२ मधील प्रथम सत्रा करीता मान्यतो |

## तालुका बार्शी

| | | |
|---|---|---|
| 8 Aided • | **सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग.** ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०२ Email: ssgm123@gmail.com Website: | प्रभारी प्राचार्य डॉ. शेख एस.ए. (शै.वर्ष-२०२१-२२ करीता) |

| | | |
|---|---|---|
| 9<br>Aided<br>• | **श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी.**<br>झाडबुके मार्ग, बार्शी.<br>ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०१<br>Email: principalsbzmb@rediffmail.com | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. गादेकर एम.बी.<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |
| 10<br>Aided<br>• | **राजर्षि शाहू लॉ कॉलेज, बार्शी.**<br>ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०१<br>Email: rslawbarshi@gmail.com<br>Website: www.rslawcollegebarshi.org | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. गाढवे शशिकांत देविदास<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |
| 11<br>Aided<br>• | **श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी.**<br>ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०१<br>Email: ssmb_barshi@rediffmail.com<br>Website: www.ssmbarshi.org | प्रभारी प्राचार्य,<br>डॉ. भारती रेवडकर<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |

## तालुका माळशिरस

| | | |
|---|---|---|
| 12 | **समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस.**<br>ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ १०७<br>Email: sgacmalshiras@gmail.com<br>Website: www.sgcmalshiras.co.in | डॉ. डी.एस. गेजगे<br>(प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार)<br>शै.वर्ष-२०२०-२१ करीता मान्यता आहे.) |
| 13<br>Aided<br>• | **शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.**<br>ता.माळशिरस,<br>जि.सोलापूर. ४१३ १०१<br>Email: smmakj@yahoo.com<br>aldeshmukh56@gmail.com<br>website: www.smmakluj.ac.in | प्रभारी प्राचार्य,<br>डॉ डी.एस. बागडे<br>शै. वर्ष-२०२०-२१ करीता |
| 14 | **सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, शंकरनगर, अकलूज. पोस्ट- यशवंतनगर, पो.बॉ.नं.५, ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ ११८**<br>Email: smpcht@gmail.com<br>Website: www.smsmpitr.org | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. यादव आय.एन.<br>शै.वर्ष-२०२१-२२ करीता मान्यता |

## तालुका पंढरपूर

| | | |
|---|---|---|
| 15 | **कॉलेज ऑफ फॉर्मसी, पंढरपूर.**<br>गोपाळपूर-रांजणी रोड, गोपाळपूर.<br>ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४<br>Email: cop_pan@rediffmail.com<br>Website: www.cobp.sveri.ac.in | प्रभारी प्राचार्य<br>डॉ. मणियार एम.जी.<br>(शै. वर्ष-२०२०-२१ करीता मान्यता) |
| 16 | **महात्मा फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन, अकलूज.**<br>ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ १०१<br>Email: mpceakluj@gmail.com<br>Website: | प्रभारी प्राचार्या,<br>डॉ.सौ. जे.ए. धुमाळ<br>९८५००६२७४४ |

## तालुका सांगोला

| | | |
|---|---|---|
| 17<br>Aided<br>• | **विज्ञान महाविद्यालय, सांगोला**<br>**ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७**<br>Email: vidnyanms@yahoo.co.in<br>Website: www.vmssangola.org | प्रभारी प्राचार्य,<br>डॉ. फुले आर. ए.<br>(शै.वर्ष-२०२१-२२ करीता) |

## तालुका माढा

| | | |
|---|---|---|
| 18<br>Aided<br>• | **मारुतीराव हरीराव महाडिक कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, मोडनिंब.**<br>ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ ३०१<br>Email: mhmmodnimb@gmail.com<br>rajendragidde@rediffmail.com | प्र-प्राचार्य<br>डॉ.शिवाजी तुकाराम पाटील |